शिक्षा अंतीम करणे बाबत (श्री.कडलग अजिनाथ रामभाऊ, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत हणमंतगाव ता.राहाता)

जिल्हा परिषद अहिल्यानगर

ग्रामपंचायत विभाग

आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/४६२/२०२६

दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

संदर्भ :- १. या कार्यालयाकडील ज्ञापन क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/६३६/२०२३,दि.२२/०८/२०२३

२.या कार्यालयाकडील सेवा निलंबन आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं ३/६३५/२०२३, दिनांक- २२/०८/२०२३

३.या कार्यालयाकडील विभागीय चौकशी अधिकारी नियुक्तीचे आदेश क्र.साप्रवि-२/ ग्रापं- ३/८२७/२०२३, दिनांक-३१/१०/२०२३.

४. सहा.आयुक्त (चौकशी), नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र.विशा.४/खाचौ / सी.आर.१६७/२०२३, दिनांक- १०/१०/२०२५ (प्राप्त दिनांक १२/१२/२०२५)

५.या कार्यालयाची अंतीम कारणे दाखवा नोटीस क्र.ग्रापं-३/२२६१८३४/ २३, दि.२५/०३/२०२६.

६.गटविकास अधिकारी पंचायत समिती संगमनेर यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/१७५७/ २०२६,दि.०१/०९/२०२६ नुसार श्री कडलग यांची अंतीम कारणे दाखवा नोटीस पोहोच दि.२२/०६/२०२६.

७.गटविकास अधिकारी पंचायत समिती संगमनेर यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/१८५७/ २०२६,दि.१८/०९/२०२६ नुसार श्री कडलग यांचा अंतीम कारणे दाखवा नोटीस खुलासा दि.०२/०९/२०२६ .

८.महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम ४ (२)

संदर्भ क्रमांक १ अन्वये, श्री.कडलग अजिनाथ रामभाऊ, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत हणमंतगाव ता.राहाता त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन गैरवर्तन केल्याने दोषारोपपत्र बजावण्यात आले होते. संदर्भ क्रमांक ३ नुसार श्री.कडलग अजिनाथ रामभाऊ,ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत हणमंतगाव ता.राहाता यांच्या गैरतर्वनाविरुध्द विभागीय चौकशी सुरु करणे कामी चौकशी अधिकारी यांची नेमणुक करण्यात आली होती.

संदर्भ क्रमांक.४ नुसार सहाय्यक चौकशी अधिकारी नाशिक विभाग नाशिक यांनी चौकशी पुर्ण करुन चौकशी अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. चौकशी अहवालामध्ये पुढीलप्रमाणे आरोपांच्या चौकशीचे निष्कर्ष नोंदविणेत आलेले आहेत.श्री.,कडलग अजिनाथ रामभाऊ,ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत हणमंतगाव ता.राहाता यांचे वर चौकशी करण्यात आलेल्या ०५ दोषारोपांपैकी ०२ आरोप अंशत: सिध्द झाले आहे,०२ आरोप सिध्द झाले आहे व ०१ आरोप सिध्द झालेला नाही.

विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील ७.१ नुसार चौकशी अहवालास सहमती दर्शविलेली असल्याने श्री.कडलग अजिनाथ रामभाऊ,ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत हणमंतगाव ता.राहाता यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन करुन महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याचे सिध्द झाले आहे. त्यामुळे त्यांना संदर्भ क्र.५ नुसार महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम ४ (२) नुसार पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल अशारितीने दोन वर्ष थोपविणे,ही शिक्षा अंतीम का करण्यात येऊ नये? याबाबतची अंतीम कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. खुलासा सादर न केल्यास अंतीम कारणे दाखवा नोटीस मध्ये नमुद केलेली शिक्षा तुम्हास मान्य आहे, असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे कळविण्यात आलेले आहे. संदर्भ क्रमांक ७ अन्वये श्री.कडलग अजिनाथ रामभाऊ,ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत हणमंतगाव ता.राहाता यांनी गटविकास अधिकारी यांच्या मार्फत सादर केलेला आहे. श्री.कडलग अजिनाथ रामभाऊ, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत हणमंतगाव ता.राहाता यांच्या खुलाश्याचे अवलोकन करता खुलासा अंशत:मान्य/अमान्य करण्यात येत आहे.

श्री.कडलग अजिनाथ रामभाऊ, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत हणमंतगाव ता. राहाता त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन करुन महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याचे सिध्द झाले आहे. त्यामुळे श्री.कडलग अजिनाथ रामभाऊ, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी यांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम ४ (२) नुसार पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर कायमस्वरूपी परिणाम होईल: अशारितीने एक वर्ष रोखणे, ही शिक्षा या आदेशान्वये अंतीम करण्यात येत आहे. सदर आदेशाची नोंद संबंधिताच्या सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 20261117120610224 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 17-11-2026 13:08:11
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत:-

१. श्री.कडलग अजिनाथ रामभाऊ, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत हणमंतगाव ता.राहाता द्वारा व प्रत- गटविकास अधिकारी, पंचायत समिती संगमनेर.
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती संगमनेर.
   २/- सदर आदेशाची नोंद संबंधिताच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
३. गटविकास अधिकारी, पंचायत समिती राहाता.
४. कार्यासन १ व २ ग्रामपंचायत विभाग,जि.प.अहिल्यानगर.